**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

मे.जनरल एस.सी.जठार(निवृत्त)
अे-१०२, नीलसदन, १४२६, सदाशिव पेठ, पुणे ४११०३० अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा महाव्यवस्थापक,
पुणे महानगर परिवहन उपक्रम, स्वारगेट, पुणे-४११०३७ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कामगार व जनता संपर्क अधिकारी,
पुणे महानगर परिवहन उपक्रम, स्वारगेट, पुणे-४११०३७

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०१५ / पुणे / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१६.१.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** मेजर जनरल एस.सी.एन.जठार(निवृत्त)
अे-१०२, नीलसदन, १४२६, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहव्यवस्थापकीय संचालक,
पुणे महानगर परिवहन उपक्रम, स्वारगेट, पुणे-४११०३७
विद्यमान श्री.ए.वाय.कारचे

**जन माहिती अधिकारी** तथा कामगार व जनता संपर्क अधिकारी,
पुणे महानगर परिवहन उपक्रम, स्वारगेट, पुणे-४११०३७
तत्कालीन - श्री.डी.ए.परदेशी, विद्यमान - श्री.नितीन रामचंद्र घोगरे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३.५.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २८.५.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.५.६.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १७.७.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती (संक्षिप्त)**<br><br>a)चलन नं.५४१७०३१९८३, दि.२८ ऑक्टोबर, २००६ प्रत / b)बिल प्रत ३२३४/३२६४ / c)रिमोल्डेड टायरबाबत सीआयआरटी संस्थेने दि.३१ मार्च २००४ रोजी दिलेल्या अहवालाची प्रत / d)व्यवस्थापक व इतर अधिकारी यांनी सीआयआरटी अहवालावर केलेले नोटिंग शीट, पत्रव्यवहार व शेरे / e)साहनी टायर्स यांच्यावर केलेल्या कारवाईचा अहवाल / f)३१ मार्च २००४ पर्यंत साहनी टायर्स यांना दिलेल्या रकमा व त्यांनी मागितलेल्या रकमांचा तपशील / g)निकषाला न उतरणाऱ्या रिमोल्डेड टायर्समुळे पीएमटीला झालेला तोटा, वसूल केला का, केला असल्यास, कोणाकडून / h)रिमोल्ड टायर्स बाबत पीएमटी वापरत असलेली चाचणी पध्दतीची माहिती / i)दि.१४ मे २००६ च्या वर्क ऑर्डर क्र.१५०७ ची प्रत, वर्क ऑर्डर त्यात ३० प्रॉपेलर शॅफ्टची मागणी होती व बिल ६० नगांचे दिले आहे, त्या बिलाची प्रत / j)दि.१४.५.२००६ च्या वर्क ऑर्डरबाबत केलेल्या चौकशी अहवालाची प्रत / k)सदर चौकशी प्रलंबित, अपूर्ण असल्यास ती पूर्ण करण्याबाबतची कालमर्यादा स्पष्ट करणारी नियमावली. | |

## विवेचन

पुणे महानगरपालिका परिवहन उपक्रमाकडील टायर रिमोल्डिंगच्या अनुषंगाने ११ मुद्दयांची माहिती मेजर जनरल एस.सी.एन.जठार (निवृत्त) यांनी जन माहिती अधिकारी तथा कामगार व जनता संपर्क अधिकारी, पुणे महानगर परिवहन उपक्रम, स्वारगेट, पुणे यांच्याकडे मागितली होती. वर्क ऑर्डर क्र.१५०७, दि.१४.५.२००६ च्या अनुषंगाने बिले व त्या संदर्भातील चौकशी अहवालाच्या प्रती आदि माहितीचा त्यात समावेश होता. सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ रोड ट्रान्सपोर्ट (सी.आय.आर.टी.) या संस्थेकडून आलेल्या अहवालानुसार साहनी टायर रिट्रेडिंग कंपनीने केलेले टायर रिमोल्डिंगचे काम विहित दर्जानुसार झालेले नसल्याचे म्हटले आहे. त्याबाबतच्या अहवालाची व पुढील कार्यवाहीची माहिती मे.जन.जठार यांनी त्यात मागितली होती. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कामगार व जनता संपर्क अधिकारी, पुणे महानगर परिवहन उपक्रम, स्वारगेट, पुणे श्री.डी.ए.परदेशी यांनी काही माहिती दिली, परंतु d, i, j, k या चार मुद्दयांची माहिती मिळाली नाही, म्हणून मे.जन.जठार अपिलीय प्राधिकारी तथा महाव्यवस्थापक, पुणे महानगर परिवहन

उपक्रम, स्वारगेट, पुणे यांच्याकडे अपील केले. यातील मुद्दा क्र.डी ची माहिती प्रभारी प्रमुख अभियंता श्री.ए.जी.शेलार यांनी या अपिलाच्या सुनावणीच्या वेळी दिली. अन्य तीन मुद्दयांबाबत माहिती उपलब्ध नसल्याचे उत्तर त्यांनी दिले. मुख्यत: वर्क ऑर्डर क्र.१५०७ च्या बिलाची प्रत उपलब्ध नसल्याचे व संबंधितांना कारणे दाखवा नोटिस दिल्यानंतरही कागदपत्रे उपलब्ध नसल्यामुळे खातेनिहाय चौकशीचे आदेश दिल्याचे त्यांनी नमूद केले होते. तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा महाव्यवस्थापक, पुणे महानगर परिवहन उपक्रम, स्वारगेट, पुणे श्री.सुबराव पाटील यांच्या निर्णयानंतरही माहिती मिळाली नाही, म्हणून मे.जन.जठार यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

दि.२४.६.२००८ च्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. परंतु उभय पक्षांमध्ये एकमत न झाल्यामुळे या अपिलाची सुनावणी घेण्यात आली.

आपण दि.३.५.२००७ रोजी माहिती मागणारा अर्ज केला. त्याला दीड वर्ष उलटून गेल्यानंतरही आपल्याला अद्याप पूर्ण माहिती मिळालेली नाही. बिलाची प्रत व अन्य माहिती मिळावी आणि नियमानुसार संबंधितांवर कारवाई व्हावी, अशी मागणी मे.जन.जठार यांनी सुनावणीत केली. मे.जन.जठार यांनी मागितलेली माहिती मुख्यत: भांडार विभाग व मुख्य लेखा व वित्त अधिकारी कार्यालय यांच्याकडील होती. मे.जन.जठार यांचा अर्ज दि.८.५.२००७ ला आपल्याला प्राप्त झाला. त्यानंतर लगेच दि.९.५.२००७ रोजी आपण संबंधित विभागांना ही माहिती देण्याबाबत पत्र लिहिले. दि.२२ व २३.५.२००७ रोजी काही माहिती या विभागांकडून प्राप्त झाली. दि.२४.३.२००७ रोजी आपण मे.जन.जठार यांना शुल्क कळविले. त्यांनी दि.२८.५.२००७ रोजी शुल्क भरुन माहिती घेतली. ज्या चार मुद्दयांची माहिती मिळाली नसल्याचे त्यांनी म्हटले आहे, ती संबंधित विभाग प्रमुखांकडून आपल्याला प्राप्त झाली नाही, म्हणूनच आपण देऊ शकलो नाही, असे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कामगार व जनता संपर्क अधिकारी, पुणे महानगर परिवहन उपक्रम, स्वारगेट, पुणे श्री.डी.ए.परदेशी यांनी लेखी व तोंडी नमूद केले. विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.नितीन रामचंद्र घोगरे व अपिलीय प्राधिकारी श्री.ए.वाय.कारचे यांनी त्याला दुजोरा दिला.

चार मुद्दयांची माहिती न मिळाल्याच्या कारणावरुन मे.जन.जठार यांनी अपिलीय प्राधिकारी तथा महाव्यवस्थापक, पुणे महानगर परिवहन उपक्रम, स्वारगेट, पुणे यांच्याकडे दि.५.६.२००७ रोजी अपील केले. प्रभारी प्रमुख अभियंता श्री.ए.जी.शेलार यांनी मुद्दा क्र.डी ची माहिती या अपिलाच्या सुनावणीच्या वेळी दिली. अपिलाच्या निकालपत्रासोबत दि.१७.७.२००७ रोजी ती मे.जन.जठार यांना देण्यात आली. मात्र (i) वर्क ऑर्डर क्र.१५०७ उपलब्ध असली तरी बिल उपलब्ध होत नाही (j) वर्क ऑर्डर नुसारच्या कामाबद्दलच्या चौकशी अहवालाची प्रत व त्यावरील कार्यवाही याबाबतची माहिती उपलब्ध नाही. त्याच अनुषंगाने (k) चौकशी व कार्यवाही पूर्ण झाली नसल्यास ती पूर्ण करण्याबाबत निश्चित मुदत स्पष्ट करणाऱ्या परिवहनमंडळाच्या सूचना/आदेश हेही उपलब्ध नाहीत, असे श्री.शेलार यांनी त्यावेळी सादर केलेल्या निवेदनात नमूद केले होते. ही माहिती न मिळाल्यामुळे प्रभारी प्रमुख अभियंता श्री.ए.जी.शेलार, अंतर्गत अर्थान्विक्षक श्री.इ ेड.ए.सय्यद, लेखा व्यवस्थापक श्री.डी.व्ही.उनवणे, प्रमुख वाहन व्यवस्थापक श्री.सुनिल गवळी यांना दि.४.७.२००७ रोजी कारणे दाखवा नोटिसा देण्यात आल्या, परंतु तरीही कागदपत्रे उपलब्ध झ ााली नाहीत, म्हणून तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा महाव्यवस्थापक, पुणे महानगर परिवहन उपक्रम, स्वारगेट, पुणे श्री.सुबराव पाटील यांनी संबंधितांवर खातेनिहाय चौकशीचे आदेश दिले, असे निवेदन तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.डी.ए.परदेशी, विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.नितीन घोगरे व विद्यमान अपिलीय प्राधिकारी श्री.ए.वाय.कारचे यांनी केले. त्याबाबतची कागदपत्रेही त्यांनी सादर केली.

संबंधित विषयातील कागदपत्रांबाबतची चौकशी आपण माहिती मागितल्यानंतर व प्रथम अपील केल्यानंतर सुरु झालेली आहे, हे मेजर जनरल जठार यांनी निदर्शनास आणले.

या संदर्भात कागदपत्रांबाबत अधिक चौकशी करण्यासाठी आपल्याला मुदत मिळावी, अशी विनंती श्री.ए.वाय.कारचे यांनी केली.

महाराष्ट्राच्या सार्वजनिक अभिलेख कायदा २००५ प्रमाणे जतनाच्या संबंधित कालावधीपर्यंत कागदपत्रांचे जतन झाले नसेल तर जबाबदार असणाऱ्यांविरुध्द फौजदारी गुन्हा नोंदविण्याची तरतूद आहे. मे.जन.जठार यांनी मागितलेली कागदपत्रे उपलब्ध होत नसतील तर या तरतुदीनुसार संबंधितांविरुध्द कारवाई केली पाहिजे. या अनुषंगाने कागदपत्रांबाबत दि.२३.१.२००९

पर्यंत जन माहिती अधिकारी श्री.डी.ए.परदेशी, श्री.नितीन घोगरे व अपिलीय प्राधिकारी श्री.ए.वाय.कारचे यांनी अहवाल सादर करावा, तसेच संबंधित संचिकांना जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांचे काही म्हणणे असल्यास त्यांनीही ते दि.२३.१.२००९ पर्यंत आयोगाला सादर करावे, असे आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

या आदेशानुसार, श्री.ए.वाय.कारचे यांनी १.खातेनिहाय चौकशी अधिकारी श्री.एन.जी.चिकणे २.मुख्य लेखा व वित्त अधिकारी श्री.डी.व्ही.उनवणे, ३.वाहतुक व्यवस्थापक श्री.सुनिल गवळी ४.सिनि.वर्कस् मॅनेजर श्री.ए.जी.शेलार ५.मुख्य अंतर्गत अर्थान्विक्षक श्री.झेड.ए.सय्यद यांना दि.१७.१.२००९ रोजी व तत्कालीन व्यवस्थापक (वाहतूक व प्रशासन) श्री.शिवराज गणपतराव राणे यांना दि.१९.१.२००९ रोजी तसे पत्र पाठविले, 'सदर प्रकरणाची चौकशी करणेसाठी आपणाकडे संपूर्ण फाईल सादर करण्यात आलेली होती असे कार्यालयीन अभिलेखावरुन दिसून येत आहे. सदर फाईल व त्यामधील कागदपत्रे त्यांनतर कार्यालयात परत आल्याचे आढळून येत नाही. त्यामुळे अर्जदारास या कागदपत्रांची, तसेच त्या अनुषंगाने पुढील कार्यवाहीबाबतची माहिती देणे शक्य झालेले नाही. सदरचे प्रकरण अंतिम नोंदीप्रमाणे आपण व्यवस्थापक (वाहतुक प्रशासन) या पदावर काम करत असताना आपल्या ताब्यात होते असे दिसून येत आहे. त्यामुळे दिनांक १६.१.२००९ रोजी झालेल्या सुनावणीनुसार व त्यामध्ये झालेल्या चर्चेनुसार हे पत्र पाठविण्यात येत असून सदर बाबतची कार्यवाही त्वरेने पूर्ण करणे आवश्यक असल्याने सदर प्रकरणाबाबत आपल्याकडील माहिती तात्काळ कळवावी,' असे श्री.ए.वाय.कारचे यांनी श्री.राणे यांना पाठविलेल्या पत्रात नमूद केले आहे.

१.मुख्य लेखा व वित्त अधिकारी श्री.डी.व्ही.उनवणे २.वाहतुक व्यवस्थापक श्री.सुनिल गवळी ३.सिनि.वर्कस् मॅनेजर श्री.ए.जी.शेलार ४.मुख्य अंतर्गत अर्थान्विक्षक श्री.झेड.ए.सय्यद ५.सिनि.लेखनिक दक्षता विभाग श्री.रा.पु.जोशी ६.सिनि.लेखनिक श्री.एस.व्ही.खोले ७.लेखनिक-लेखा विभाग श्री.म.स.बलकवडे या सात व्यक्तींकडून कागदपत्रे उपलब्ध न होण्याबाबतचे खुलासे मागविण्यात आले. त्यांचे खुलासे व चौकशी यावरुनअसे निष्पन्न झाले, की दक्षता प्रमुखांकडे दि.१४.९.२००६ रोजी संबंधित कागदपत्रे लेखा विभागामार्फत देण्यात आली. दि.२८.९.२००६ रोजी प्रभारी मुख्य अभियंता श्री.ए.जी.शेलार यांच्या कार्यालयात सदरच्या बिलाची मागणी लेखा

विभागाकडून करण्यात येऊन ती श्री.शिवराज राणे यांच्या ताब्यात दिली, असा उल्लेख श्री.शेलार यांच्या जबाबामध्ये आहे. दक्षता विभागाकडे दि.१४.९.२००६ रोजी सादर करण्यात आलेली कागदपत्रे पुन्हा लेखा विभागामार्फत दि.२८.९.२००६ रोजी श्री.शिवराज राणे यांच्याकडे उपलब्ध झालेली आहेत हे सिध्द होते. सदर कागदपत्रे लेखा विभागाकडे जमा न होता ती श्री.शिवराज राणे अगर श्री.ए.जी.शेलार यांच्याकडे असावीत असा बोध होत आहे, असा अहवाल आपण दि.१८.८.२००७ रोजी तत्कालीन अपिलीय प्राधिकाऱ्यांना सादर केला. 'चर्चा करावी ' या आदेशासह महाव्यवस्थापक कार्यालयाकडून ही संचिका दि.२१.८.२००७ रोजी आपल्याकडे प्राप्त झाली. त्यास अनुसरुन चर्चा झाली. त्यानंतर सदरची संचिका पुढील कोणत्याही आदेशाशिवाय आमच्या विभागाकडे अलाहिदा नंतर आली. तथापि त्यावर कोणतेही आदेश प्राप्त नसल्याने पुढील कारवाई होऊ शकली नाही, असे खातेनिहाय चौकशी अधिकारी श्री.एन.जी.चिकणे यांनी दि.२०.१.२००९ रोजी सहव्यवस्थापकीय संचालकांना सादर केलेल्या निवेदनात नमूद केले आहे.

'सदर प्रकरणी माझा अहवाल मी तत्कालीन महाव्यवस्थापक श्रीमती केरकट्टा यांना समक्ष सादर केला. मी दिलेला अहवाल गोपनीय असून त्या अहवालासोबत मूळ कागदपत्रे सहपत्रित केली होती. तत्कालीन महाव्यवस्थापक यांनी सदर गोपनीय अहवालावर कारवाई करण्यासाठी तत्कालीन व्यवस्थापक (वाहतुक व प्रशासक) श्री.राणे यांच्याकडे पुढील कामी चौकशीसाठी दिले. सदर प्रकरण चौकशी कामी श्री.राणे यांच्याकडे सुपूर्त केल्यानंतर अथवा जाबजबाब या कामी मला कधीही बोलावले नाही व मूळ प्रकरण माझ्याकडे दिलेले नाही. तसेच मी मूळ रिपोर्टर असल्याने सदरचे प्रकरण पुन्हा माझ्याकडे येण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही,' असे वाहतूक व्यवस्थापक श्री.एस.जी.गवळी यांनी दि.१९.१.२००९ रोजी अलिपीय प्राधिकारी तथा सहव्यवस्थापकीय संचालक यांना पाठविलेल्या निवेदनात म्हटले आहे.

'सदर बिले लेखा विभागाचे ताब्यातून घेण्यात आली असून ती पुन्हा लेखा विभागाकडे जमा केली नाहीत. तसेच दि.२०.१.२००७ ते दि.२२.१.२००७ चे आमचे निवेदनानुसार सदर बिले संबंधितांकडेच आहेत व ती त्या विभागाकडून प्राप्त करुन घ्यावी अशी आमची विनंती आहे,' असे मुख्य लेखा व वित्त अधिकारी श्री.डी.व्ही.उनवणे यांनी आपल्या दि.१९.१.२००९ रोजी अपिलीय प्राधिकारी तथा सहव्यवस्थापकीय संचालक यांना पाठविलेल्या निवेदनात म्हटले आहे.

'ऑडिट बिलाबाबत आम्ही आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, आमचे विभागाकडून मे.हैदर कन्स्ट्रक्शन कार्पोरेशन यांचेकडील जॉबवर्कची बिले मा.मुख्य अभियंता विभागाकडून आमचे विभागात आल्यानंतर त्यांची तपासणी करुन बिल क्र.५१९, ५२२ व ५३१, दि.१६.६.२००६ अशी एकूण तीन बिले पुढील कार्यवाहीसाठी लेखा कार्यालयाचे चेक विभागाकडे पाठविण्यात आली होती. त्यानंतर ती बिले आमचे विभागाकडे परत आली नाहीत. आमचे विभागाकडून बिले पुढील कार्यवाहीसाठी गेल्यानंतर ती पुन्हा ऑडिट विभागात येत नाहीत.' मे.हैदर कन्स्ट्रक्शन कार्पोरेशन यांचेकडील जॉब वर्कची बिले मा.मुख्य अभियंता विभागाकडून तपासणी करणेकामी ऑडिट विभागाकडे दाखल झाली होती. त्यांचे ऑडिट बिल क्र.५१९, ५२२ व ५३१, दि.१६.६.२००६ असे असून ती तपासणी करुन पुढील कामासाठी लेखा कार्यालयाचे चेक विभागाकडे पाठविण्यात आली होती. सदर बिले चौकशी करणेकामी व दक्षता विभागाच्या दि.१४.९.२००६ च्या मागणीनुसार त्या विभागाच्या ताब्यात देण्यात आली आहेत. बिले त्यांच्या ताब्यात मिळाल्याबद्दल दक्षता विभागाची छायांकित प्रत यासोबत जोडीत आहोत. श्री.जठार यांनी त्यांच्या दि.३.५२००७ रोजीच्या मागणी अर्जातील अनु क्र.(i) मधील वर नमूद केलेली बिले (मूळ प्रती) संपूर्ण व्हाउचरसहीत दक्षता विभागाकडून लेखा विभागाकडे परत मिळाल्यास आपणाकडे सादर करण्यात येईल,' असे मुख्य अंतर्गत अर्थान्विक्षक श्री.झेड.ए.सय्यद यांनी अपिलीय प्राधिकारी यांना पाठविलेल्या निवेदनात नमूद केले आहे.

वरील खुलासे लक्षात घेता कागदपत्रे - मुख्यतः बिले - दक्षता विभागाकडे आहेत की लेखा विभागाकडे, असा प्रश्न आहे व उभय विभाग परस्परांवर जबाबदारी टाकण्याचा प्रयत्न करीत आहेत, असे दिसते.

संदर्भित बिल क्र.५२२ उपलब्ध झालेले नाही, ही वस्तुस्थिती आहे.

आपण परिवहन उपक्रमाकडे केलेला अर्ज व विचारण्यात आलेली माहिती अत्यंत चांगली आहे, प्रशासनाच्या कामात अधिक गती, सेवा चांगली कार्यक्षम होण्यासाठी यांचा चांगला उपयोग होणार आहे, असे तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.डी.एस.परदेशी यांनी दि.२४.५.२००७ रोजी मे.जन.जठार यांना लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे. प्रत्यक्षात मात्र गेल्या दीड वर्षात आवश्यक कागदपत्रे देण्याबाबत कार्यक्षमता व गती दिसून आलेली नाही.

वर्क ऑर्डरबाबतच्या चौकशीतील माहिती दि.७.६.२००७ ला दिली आहे. त्यामुळे कार्यालयात उपलब्ध असणारी कागदपत्रे देण्यात आली आहेत. या प्रकरणात खातेनिहाय चौकशी झालेली नाही, असे चौकशी अधिकाऱ्यांच्या अहवालावरुन दिसून येते. त्यामुळे मुद्दा क्र.जे व के बाबत कोणतीही पूर्तता करणे बाकी नाही. मुद्दा क्र.आय(बिल क्र.५२२) बाबत मतभिन्नता आहे. हे बिल कार्यालयात उपलब्ध होत नाही. हे बिल श्री.शिवराज राणे यांच्याकडे दिलेले आहे, परंतु ते परत संबंधित विभागाकडे परत प्राप्त झालेले नसल्याचे दिसून येत आहे. त्याबाबत श्री.राणे यांना पत्र पाठविलेले आहे, असे विद्यमान अपिलीय प्राधिकारी तथा सहव्यवस्थापकीय संचालक, पुणे परिवहन महामंडळ मर्या. श्री.ए.व्ही.कारचे यांनी दि.२२.१.२००९ रोजी आयोगाला सादर केलेल्या निवेदनाद्वारे नमूद केले आहे.

आपण माहिती देण्यासाठी संबंधित विभागाकडे प्रामाणिकपणे व भरपूर पाठपुरावा केला. प्रथम अपिलानंतरच्या कार्यवाहीतही त्वरेने काम केले, संबंधित विभागाकडून माहिती न मिळाल्यामुळेच ती उपलब्ध करुन देणे प्रशासकीयदृष्ट्या शक्य झालेले नाही, त्यामुळे माहिती देण्यास जबाबदार असलेले म्हणून (माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार) पर्यायाने जन माहिती अधिकारी ठरणारे संबंधित विभागप्रमुख यांची ही जबाबदारी आहे, असे प्रतिपादन श्री.डी.ए.परदेशी व श्री.नितीन घोगरे यांनी दि.२२.९.२००९ रोजी आयोगाला सादर केलेल्या निवेदनात केले आहे.

मे.जन.जठार हे खातेनिहाय चौकशीबाबतची कागदपत्रे मागत आहेत, परंतु मूळ वर्क ऑर्डरमधील व्यवहाराबाबत खातेनिहाय चौकशी झालेली नाही, तर संबंधित कागदपत्रांच्या अनुषंगाने खातेनिहाय चौकशीचे आदेश देण्यात आले होते. त्याबाबतची कागदपत्रे देण्यात आली आहेत, असे श्री.ए.वाय.कारचे, श्री.डी.ए.परदेशी व श्री.नितीन घोगरे यांनी लेखी व तोंडी स्पष्ट केले. सर्व कागदपत्रांचे अवलोकन करता त्यांचे हे म्हणणे रास्त असल्याचे दिसते. मात्र ही बाब प्रारंभीच्या उत्तरात स्पष्ट केलेली नाही. उलट, 'सदर मुद्दयातील कोणतीही कागदपत्रे उपलब्ध झालेली नाहीत,' अशी चुकीची व दिशाभूल करणारी माहिती त्यात दिली आहे.

बिल क्र.५२२ हा या कागदपत्रांमधील महत्त्वाचा दस्तऐवज आहे. बिले व वर्क ऑर्डर ही कागदपत्रे 'क' वर्गात (पाच वर्षे जतन करण्याच्या कालमर्यादेमध्ये) येतात, असे प्रशासन अधिकारी

श्री.एस.के.मते यांनी स्पष्ट केले आहे. क वर्गातील हा अभिलेख असल्यामुळे पाच वर्षे जतन होणे आवश्यक असूनही तो प्राप्त होत नाही. संबंधित विभागाचे प्रमुख त्याला जबाबदार असून जन माहिती अधिकारी श्री.डी.ए.परदेशी व श्री.नितीन घोगरे यांचा त्यात दोष नाही, हे त्यांचे म्हणणे त्यांच्या निवेदनावरुन व त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांवरुन स्पष्ट होते.

संबंधित बिलाबाबत खातेनिहाय चौकशी अधिकाऱ्यांनी काढलेला निष्कर्ष पाहता बिल क्र.५२२ हे श्री.राणे यांच्याकडे देण्यात आल्याचे व त्यांनतर ते बिल गहाळ झाल्याचे दिसून येते. परंतु निर्णायकरीत्या ते सिध्द झाल्याचे म्हटलेले नाही. या प्रश्नाची तड लावण्याचा प्रयत्नही झालेला दिसत नाही. परिणामी माहिती न देण्यास संबंधित विभागप्रमुख जबाबदार ठरतात. संबंधित कंपनीकडे मागणी करुन त्यांच्या स्थळप्रतीवरुन बिल क्र.५२२ ची प्रत देणे शक्य होते. परंतु तसा प्रयत्नही महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या अधिकाऱ्यांनी केलेला नाही. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ४ अन्वयेही स्वयंस्फूर्तीने जाहीर करण्याच्या विषयांत समावेश होणारी ही माहिती जतन केलेली नसल्याबद्दल, तसेच न दिल्याबद्दल माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये ते शास्तीस पात्र ठरतात. महाराष्ट्र अभिलेख कायदा २००५ अन्वये संबंधित विभाग प्रमुखांवर कारवाई करावी.

## <u>आदेश</u>

(१) अपील मान्य.

(२) विद्यमान जन माहिती अधिकारी तथा असिस्टंट डेपो मॅनेजर श्री.नितीन घोगरे व तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.डी.एस.परदेशी यांचा खुलासा मान्य करण्यात येत आहे. ते कारवाईस पात्र ठरत नाहीत.

(३) माहिती न दिल्याबद्दल पुणे महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या प्रशासनाला जबाबदार धरण्यात येत असून रु.२५०००/- शास्ती लावण्यात येत आहे. मात्र ती परिवहन उपक्रमाच्या खजिन्यातून भरावयाची नाही, जबाबदार व्यक्तींकडून वसूल करावयाची आहे. वाहतुक व्यवस्थापक(दक्षता विभागप्रमुख) श्री.एस.जी.गवळी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी श्री.डी.व्ही.उनवणे, मुख्य अंतर्गत अर्थान्विक्षेक श्री.झेड.ए.सय्यद व तत्कालीन व्यवस्थापक(वाहतुक व प्रशासन)श्री.शिवराज राणे

यांच्यासह संबंधितांची जबाबदारी निश्चित करुन त्यांच्याकडून त्या त्या प्रमाणात ही शास्ती वसूल करुन ती दि.१०.३.२००७ पर्यंत '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही कार्यकारी संचालक, पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. यांनी करावी. फेब्रुवारी २००९ च्या मार्च २००९ मध्ये देय असलेल्या वेतनातून याची वसुली करण्यात यावी. तसेच याची नोंद संबंधितांच्या सेवापुस्तकात व गोपनीय अहवालात घेऊन त्याचा अहवाल आयोगाला सादर करावा. यातील कोणी सेवानिवृत्त झाले असल्यास त्यांच्या सेवानिवृत्ती वेतनातून सदर शास्तीची रक्कम दोन हप्त्यात कपात करावी.

(४) बिल क्र.५२२ संबंधित कंपनीकडील स्थळप्रतीवरुन मागवून साक्षांकित करुन अपीलकर्ता मेजर जनरल एस.सी.एन.जठार(निवृत्त) यांना दि.२५.२.२००९ पर्यंत पुरवावी. ही जबाबदारी कार्यकारी संचालक, पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. यांची राहील.

(५) नियमानुसार जतन कालावधीपर्यंत कागदपत्रे जतन न करण्यास जबाबदार असणाऱ्या कर्मचाऱ्यांवर महाराष्ट्र अभिलेख कायदा २००५ अन्वये कारवाई करुन कार्यकारी संचालक, पुणे महानगर परिवहन महामंडळ, लि. यांनी आयोगास अहवाल सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.१६.२.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे विशेष अपील निर्गत कार्यक्रम दि.२७.०२.२००९ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता.

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १०३३/ सोलापूर | श्री.कैलास सिध्देश्वर काळे मोहोळ, क्रांतीनगर, ता. मोहोळ, जि. सोलापूर | ग्रामसेवक, ग्रामपंचायत, मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर | विस्तार अधिकारी, पंचायत समिती, मोहोळ, जि. सोलापूर | मोहोळ मध्ये चालू असलेला कत्तलखाना कायदेशीर आहे की बेकायदेशीर, कायदेशीर असल्यास परवान्याची झेरॉक्स, कायदेशीर नसल्यास का चालू ठेवला, गावामध्ये रिकामी जागा किती व कोठे आहे इत्यादी. | अपीलकर्त्यास आवश्यक माहिती पाच दिवसांत नि:शुल्क देण्याचे जन माहिती अधिकारी / अपिलीय प्रधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. |
| २ | १२२६/ सोलापूर | श्री.रामलिंग सिद्राम कवचाळे मु.पो.बोराळे, ता.मंगळवेढा, जि. सोलापूर | ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत, बाराळे, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर | विस्तार अधिकारी (पंचा), पंचायत समिती, मंगळवेढा, जि. सोलापूर | मौजे बाराळे येथील शॉपिंग सेंटरची जागा कोणत्या सिटी स. नं. अथवा गट नंबर मध्ये येते याची माहिती. | आवश्यक माहिती मिळाल्याचे अपिलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | १३१४/ सोलापूर | श्री.धनाजी दिनकर रूपनवर मु. डोंबाळवाडी (कुरबावी), पो. शिंदेवाडी, ता. माळशिरस, जि. सोलापूर | ग्रामसेवक, ग्रामपंचायत, डोंबाळवाडी (कुरबावी), ता.माळशिरस, जि. सोलापूर | विस्तार अधिकारी (ग्रामपंचायत), पंचायत समिती, माळशिरस, जि. सोलापूर | लेखा समितीची प्रत, अधिकार व कर्तव्ये, पाणी पुरवठा समिती प्रत, अधिकार व कर्तव्य, पाणीपुरवठा बजेट, पाणी पुरवठा योजनेसाठी झालेला खर्च अधिकृत पावत्यांसह इत्यादी. | विशेष अपिल निर्गत कार्यक्रमांत अपीलकर्त्यांने माहिती स्वीकारली. |
| ४ | ८५९/ सोलापूर | श्री.तुकाराम नामदेव जाधव मु. शेंडेचिंच, पो. मळोली , ता. माळशिरस, जि. सोलापूर | ग्रामसेवक, ग्रामपंचायत, शेंडेचिंच, पो. मळोली ता.माळशिरस, जि. सोलापूर | गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माळशिरस, जि. सोलापूर | घरपट्टी जमा झालेल्या खर्चाचा हिशोब, जवाहर योजना, आमदार निधी, पाणी पुरवठा योजना, ग्रामपंचायतला आलेला वेगवेगळा निधी याच्या जमाखर्चाचा हिशोब. | आवश्यक माहिती मिळाल्याने तक्रार राहिली नसल्याचे अपिलकर्त्याचे दि.२५.२.०९ चे निवेदन जन माहि... अधिकारी /अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात सोबत सादर केले आहे. |
| ५ | ७६५/ सोलापूर | श्री.संदिपान धोंडू कोळी मु. पो. यलमवाडी, ता. मोहोळ, जि. सोलापूर. | ग्रामसेवक ग्रामपंचायत, यलमवाडी, ता. मोहोळ, जि. सोलापूर | गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मोहोळ, जि. सोलापूर | जून २००३ ते डिसें. २००६पर्यंतचा पगार रजिस्टर नमुना २४ चा उतारा व जबाब. | आवश्यक माहिती मिळाल्याने तक्रार राहिली नसल्याचे अपिलकर्त्याचे दि.१०.०१.०८चे निवेदन जन माहिती अधिकारी /अपिलीय प्राधिकारी यां... प्रपत्रात सोबत सादर केले. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

१) वरील तक्त्यातील अपिले अ. क्र. १ ते ५ (क्र. १०३३, १२२६, १३१४, ८५९ व ७६५) निकाली काढण्यात येत आहेत.

२) अपील क्र. १०३३ मध्ये विशिष्ट मुदतीत माहिती देण्याबाबत उभयतांमध्ये एकमत झाले आहे. त्यानूसार पूर्तता करून जन माहिती अधिकारी / अपिलीय प्राधिकारी यांनी हा आदेश प्राप्त झाल्यापासून एक आठवडयात पूर्तता अहवाल आयोगाला सादर करावा. त्यानूसार पूर्तता न झाल्यास सबंधित अधिकारी नियमानूसार शास्ती व अन्य कारवाईस पात्र ठरतील.

पुणे
दि.२७.०२.२००९ .

(राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ)

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे :

| अ. क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १०९९ / पुणे | श्री. सुधीर आबासाहेब जाधव ज्ञान प्रबोधिनी स्पर्धा परीक्षा केंद्र, सदाशिव पेठ, पुणे-३० | मुख्याध्यापक, शरदराव शिंदे प्रशाला, पाच्छापूर, ता.जत, जि.सांगली | सचिव, श्री रूक्मिणी महिला विद्यापीठ, पंढरपूर, जि.सोलापूर | सन २००२-२००३, २००३-२००४ या कालावधीतील संस्था हस्तां-तरणाबाबतची माहिती | आवश्यक ती माहिती प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने दि.६.१.२००९ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. |
| २ | २१६६ /पुणे | श्री. अनिल मल्हारी भंडारकर रा.चिंचेची बाग झोपडपट्टी, कडेपठार रोड, पो.जेजुरी, ता.पुरंदर, जि.पुणे | निवासी नायब तहसीलदार, पुरंदर, ता.पुरंदर, जि. पुणे | तहसीलदार, पुरंदर, ता.पुरंदर, जि. पुणे | हक्कविलेखातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे उच्चस्तरीय चौकशी होणेबाबत | आवश्यक ती कागदपत्रे कागदपत्रे मिळाल्याचे अपीलकर्त्याने दि.२७.१.२००७ रोजी नायब तहसीलदार, पुरंदर यांच्याकडे दिलेल्या जबाबात नमूद केले. मूळ मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही. |
| ३ | २२७६/ पुणे | श्री. उज्वल चक्रपाणी सुर्यवंशी एफ-६५, शास्त्रीनगर, येरवडा, पुणे-६ | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे-१ | अधीक्षक अभियंता, अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे | एफ-६५, शास्त्रीनगर, पुणे येथील शासकीय सदनिकांच्या अंगणात बांधण्यात आलेल्या दत्त | जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी अपीलकर्ता गैरहजर असल्याचे प्रपत्रात नमूद केले आहे. तसेच अपीलकर्त्यास माहिती |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | मंदिराच्या बांधकाम परवान्याची प्रत मिळणेबाबत. तसेच सदर बांधकाम बेकायदेशीर असल्यास ते कधी तोडणार याबाबत माहिती | माहिती घेऊन जाण्याबाबत कळविलेले आहे. आता सदर माहिती टपालाद्वारे पाठविण्यात येईल असे नमूद केले आहे. |
| ४ | ११९५/ पुणे | श्री. वसंत प्रल्हाद कुलकर्णी स.नं.७/२, गल्ली नं.१०, जानकी क्लिनिक मागे, कर्वेनगर, पुणे-५२ | कामगार अधिकारी, राज्य परिवहन, सोलापूर विभाग, सोलापूर | विभाग नियंत्रक, राज्य परिवहन, सोलापूर विभाग, सोलापूर | श्री. के.व्ही.पाटील कामगार अधिकारी, राज्य परिवहन विभाग,यांनी दि.१.१.२००६ ते दि.३०.११.२००६ या कालावधीत कोणत्या डेपोला भेटी दिल्या याबाबत | आवश्यक ती माहिती प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ५ | ११९०/ पुणे | श्री. वसंत प्रल्हाद कुलकर्णी | कामगार अधिकारी, राज्य परिवहन, सोलापूर विभाग, सोलापूर | विभाग नियंत्रक, राज्य परिवहन, सोलापूर विभाग, सोलापूर | श्री. के.व्ही.पाटील कामगार अधिकारी, राज्य परिवहन विभाग,यांनी दि.१.१.२००६ ते दि.३०.११.२००६ या कालावधीत कोणत्या डेपोला भेटी दिल्या याबाबत | आवश्यक ती माहिती प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ६ | ७८७/ पुणे | श्री. वसंत प्रल्हाद कुलकर्णी | कामगार अधिकारी, राज्य परिवहन, सोलापूर विभाग, सोलापूर | विभाग नियंत्रक, राज्य परिवहन, सोलापूर विभाग, सोलापूर | सेवापुस्तक, तसेच सन १९५५ ते जि.३.१९५८ या कालावधीतील ग्रॅच्युएटीच्या फरकाची रक्कम मिळणेबाबत | जन माहिती अधिकारी/ अपिलीय प्राधिकारी यांनी अपीलकर्त्यास माहिती दिल्याचे प्रपत्रात नमूद केले आहे. ग्रॅच्यूएटीच्या फरकांची रक्कम मिळणे ही बाब माहितीच्या अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

वरील तक्त्यात नमूद केलेली अनु.क्र. १ ते ६ ही सर्व अपिले (क्र.१०९९, २१६६, २२७६, ११९५, ११९० व ७८७) निकाली काढण्यात येत आहेत.

पुणे
दि. २४.२.२००९

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे :

| अ. क्र | अपील क्रमांक | अपील-कर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ११९४/ पुणे | ॲड. कांतीलाल के.संचेती ८४१/२, सदाशिव पेठ, पुणे-३० | सह दुय्यम निबंधक, हवेली क्र.२, पुणे | सह जिल्हा निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी पुणे शहर, पुणे | दस्त क्र.१०९२३ /८४ मिळणेबाबत | आवश्यक ती माहिती प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने दि.२९.१.२००९ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. |
| २ | १६७३/ पुणे | श्री. सय्यद तजुद्दीन कासम स.नं.७५/४ , वानवडी, शांतीनगर, पुणे | उप कार्यकारी अभियंता, सेंटमेरी उपविभाग, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या., पुणे | कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या., पुणे | श्रीमती शाहीन रशीद शेख यांनी दि.२५.९. २००२ रोजी केलेल्या अर्जाची प्रत, कोटेशन फॉर्म क्र.४२८९ दि.३१.१०.२००७ रोजीचे पत्र इ. पाच मुद्दयांची माहिती | आवश्यक ती माहिती अपीलकर्त्यास १५ दिवसांत देण्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ३ | २०३३/ पुणे | श्री. शंकर सखाराम गालिंदे २८६, दत्तवाडी, पुणे-३० | चेअरमन/ सेक्रेटरी सेनादत्त मंडळ सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे | उपनिबंधक सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे | संस्थेची नोंदणी केल्यापासून संस्थेचे सभासद, सभासदांचे पत्ते, दूरध्वनी क्रमांक व संस्थेच्या नावाची प्रत | आवश्यक ती माहिती एक महिन्यात अपीलकर्त्यास देण्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | २०५८ / पुणे | श्री. हर्षकुमार पो.बम्ब २३१/२, नाना पेठ, पुणे-२ | सह जिल्हा निबंधक वर्ग-१ व मुद्रांक जिल्हाधिकारी पुणे शहर, पुणे | सह जिल्हा निबंधक वर्ग-१ व मुद्रांक जिल्हाधिकारी पुणे शहर, पुणे | सन १९९५-९६ ते ३१.१२.२००७ या कालावधीत किती दस्त नोंदणी केले. अ पत्रक/सीटीएस पत्रके किती पाठविण्यात आली आहेत. | आवश्यक ती माहिती अपीलकर्त्यास आठ दिवसांत देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ५ | २६७७/ पुणे | श्री. प्रकाश दत्तात्रय मांगले दत्तप्रभा, ४२, विवेक सोसायटी, पद्मावती, पुणे-९ | क्षेत्रिय अधिकारी, सहकार नगर क्षेत्रीय कार्यालय क्र.३, पुणे महानगर-पालिका, पुणे | उप आयुक्त, सहकार नगर क्षेत्रीय कार्यालय क्र.३, पुणे महानगर-पालिका, पुणे | अतिक्रमण खात्यातील अधिकारी श्री. गायकवाड यांच्या नेमणुकीबाबत कागदपत्रे व अतिक्रमणा संबंधित एकूण पाच मुद्दयांची माहिती | अतिक्रमणाबाबत दक्षता घेतली जाईल, असे जन माहिती अधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. मात्र ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. वरील तक्त्यातील नमूद केलेली अपिले अनु.क्र. १ ते ५ (क्र. ११९४, १६७३, २०३३, २०५८ व २६७७ ) निकाली काढण्यात येत आहेत.

२. विशिष्ट मुदतीत माहिती देण्याबाबत उभयतांमध्ये एकमत झाले आहे, असे वरील अपिलांमध्ये नमूद केले आहे, तेथे पूर्तता करून जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी संबंधित मुदतीनंतर एक आठवड्यात अहवाल आयोगास सादर करावा. त्यानुसार पूर्तता न झाल्यास संबंधित अधिकारी नियमानुसार शास्ती व अन्य कारवाईस पात्र ठरतील.

**पुणे**
**दि. २६.२.२००९**

**( विजय कुंवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे विशेष अपील निर्गत कार्यक्रम दि.२७.०२.२००९ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात श्री. संभाजी सिद्राम मस्के, घ. नं. ३७, राजीव गांधी नगर, भवानी पेठ, सोलापूर यांच्या खालीलअपिलांचा समावेश होता.

| अ. क्र. | अपील क्रमांक | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|
| १ | १२७६/ सोलापूर | मुख्याध्यापक, विकास विद्यालय, हनुमान नगर, भवानी पेठ, सोलापूर | अध्यक्ष, भारत शिक्षण प्रसारक मंडळ, भवानी पेठ, सोलापूर | व्यवस्थापन मंडळाच्या पदाधिका-यांची नावे पद, पत्ता, शाळेचे मुख्याध्यापक, कर्मचारी यादी, शालेय समिती मिटिंग इतिवृत्त,वार्षिक परीक्षा निकाल व इतर एकूण आठ मुद्यांची माहिती. | आवश्यक माहिती मिळाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले. |
| २ | १२७७/ सोलापूर | मुख्याध्यापक, विकास विद्यालय, हनुमान नगर, भवानी पेठ, सोलापूर | अध्यक्ष, भारत शिक्षण प्रसारक मंडळ, भवानी पेठ, सोलापूर | इ.५ वी ते ७ वी शिष्यवृत्ती लाभ घेतलेल्या विद्यार्थ्यांची नावे, रक्कम यादी, शिष्यवृत्ती प्रस्तावांच्या प्रती, शासनाकडून मंजूर शिष्यवृत्ती यादी, सेवक संच निश्चिती छायांकित प्रती व इतर एकूण सहा मुद्यांची माहिती. | आवश्यक माहिती मिळाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले. |
| ३ | १२७८/ सोलापूर | मुख्याध्यापक, श्री व्यंकटेश बाल विद्यालय, दाळगे प्लॉट, भवानी पेठ, सोलापूर | अध्यक्ष, महाराष्ट्र सेवा संघ, दाळगे प्लॉट, भवानी पेठ, सोलापूर | इ.५ वी ते ७ वी शिष्यवृत्ती लाभ घेतलेल्या विद्यार्थ्याची नावे, रक्कम यादी, शिष्यवृत्ती प्रस्तावांच्या प्रती, शासनाकडून मंजूर शिष्यवृत्ती यादी, सेवक संच निश्चिती छायांकित प्रती व इतर एकूण सहा मुद्यांची माहिती. | आवश्यक माहिती मिळाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४ | १२७९/ सोलापूर | मुख्याध्यापक, श्री व्यंकटेश बाल विद्यालय, दाळगे प्लॉट, भवानी पेठ, सोलापूर | अध्यक्ष, महाराष्ट्र सेवा संघ, दाळगे प्लॉट, भवानी पेठ, सोलापूर | व्यवस्थापन मंडळाच्या पदाधिका-यांची नावे, पत्ता, पदनाम, शाळेचे मुख्याध्यापक , कर्मचारी यादी, शालेय समिती मिटिंग इतिवृत्त, वार्षिक परीक्षा निकाल, विद्यार्थी उपस्थिती पत्रक व इतर एकूण आठ मुद्यांची माहिती. | आवश्यक माहिती मिळाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले. |
| ५ | १२८०/ सोलापूर | मुख्याध्यापक, करंजकर विद्यालय, तुळजापूर वेस, सोलापूर | अध्यक्ष, करंजकर शिक्षण प्रसारक मंडळ, तुळजापूर वेस, सोलापूर | व्यवस्थापन मंडळ पदाधिकारी नावे, पदनाम व पत्ता, शाळेतील मुख्याध्यापक,शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यादी, सेवक संच प्रती, विद्यार्थी हजेरीपट, निकाल, संगणकीकरण प्रपत्र, शिक्षक हजेरीपत्रक इत्यादी माहिती. | आवश्यक माहिती मिळाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद के[illegible] |
| ६ | १२८१/ सोलापूर | मुख्याध्यापक, सी.जी. बेंबगळी विद्यालय, ११८, पश्चिम मंगळवार पेठ, सोलापूर | अध्यक्ष, चनमल्लया गुरय्या बेंबगळी शिक्षण प्रसारक मंडळ, ११८, पश्चिम मंगळवार पेठ, सोलापूर | अस्वच्छ व्यवसाय शिष्यवृत्ती, अपंग शिष्यवृत्ती, सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती इ. योजनांची यादी, शासनाकडे पाठविलेले प्रस्ताव, शिष्यवृत्तीचे बँक स्टेंटमेंट, शाळेतील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यादी इत्यादी माहिती. | अपीलकर्त्यास आवश्यक असलेली माहिती आठ दिवसांत देण्याबाबत उभयतात एकमत झाले. |
| ७ | १२८२/ सोलापूर | मुख्याध्यापक, सी.जी. बेंबगळी विद्यालय, ११८, पश्चिम मंगळवार पेठ, सोलापूर | अध्यक्ष, चनमल्लया गुरय्या बेंबगळी शिक्षण प्रसारक मंडळ, ११८, पश्चिम मंगळवार पेठ, सोलापूर | व्यवस्थापन मंडळ पदाधिकारी नावे, पदनाम व पत्ता शाळेतील मुख्याध्यापक,शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यादी, सेवक संच प्रती, शालेय समिती सभा इतिवृत्त, विद्यार्थी हजेरीपट, शाळेचा निकाल, संगणकिकरण प्रपत्र व इतरआठ मुद्यांची माहिती. | अपीलकर्त्यास आवश्यक असलेली माहिती आठ दिवसांत देण्याबाबत उभयतात एकमत झाले. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ८ | १२८६/ सोलापूर | मुख्याध्यापक, भोलेनाथ विद्या मंदिर, जवळकर वस्ती, सोलापूर | अध्यक्ष, मंगल शिक्षण प्रसारक मंडळ, १९१, बुधवार पेठ, जवळकर वस्ती, सोलापूर | अस्वच्छ व्यवसाय शिष्यवृत्ती, अपंग शिष्यवृत्ती व सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती लाभार्थी विद्यार्थी यादी, रक्कम, बँक स्टेटमेंट, रोस्टर व इतर एकूण चार मुद्यांची माहिती. | आवश्यक माहिती मिळाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले. |



अपीलकर्त्याने विविध शिक्षण संस्थेकडे एकाच प्रकारची व विस्तृत माहिती मागितली आहे. अशा प्रकारे सरसकट माहिती मागण्यापेक्षा अपीलकर्त्याने नेमकी माहिती मागणे योग्य ठरेल.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

१) वरील तक्त्यातील अपिले (अ.क्र. १ ते ८ (क्र. १२७६, १२७७, १२७८, १२७९, १२८०, १२८१, १२८२ व १२८६) निकाली काढण्यात येत आहेत.

२) अपील क्र १२८१ व १२८२ या अपिलांमध्ये विशिष्ट मुदतीत माहिती देण्याबाबत उभयतांमध्ये एकमत झाले आहे, त्यानुसार पूर्तता करून जन माहिती अधिकारी /अपिलीय प्राधिकारी यांनी हा आदेश प्राप्त झाल्यापासून एक आठवडयात पूर्तता अहवाल आयोगाला सादर करावा,

**पुणे**
**दि.२७.०२.२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्रीमती शेवंता भाऊ मिसाळ
मु.जंक्शन, पोस्ट लासुर्णे, ता.इंदापूर, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रकल्प अधिकारी,
एकात्मिक बालविकास सेवायोजना प्रकल्प, इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४९+३५८ / पुणे /२००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१.५.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्रीमती शेवंता भाऊ मिसाळ
मु.जंक्शन, पोस्ट लासुर्णे, ता.इंदापूर, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे श्री.डी.ए.वानखेडे

**जन माहिती अधिकारी** तथा प्रकल्प अधिकारी,
एकात्मिक बालविकास सेवायोजना प्रकल्प, इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे श्री.जे.आर.राव

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ९.१.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २३.१.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २८.५.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ८.८.२००७ |

| ८ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती<br><br>दि.३.२.१९९६ ते ३०.११.२००५ या कालवधीतील अंगणवाडी कार्यकर्तीचे आपण जप्त केलेल्या शेरेबुकातील प्रत्येक पानाची प्रमाणित प्रत व आपल्या कार्यालयाकडे दि.१७.१.२००५ पासूनच्या प्रत्येक नोटिशीच्या खुलाशाच्या प्रमाणित प्रती, तसेच दि.६.४.२००५ च्या ग्रामस्थांच्या तक्रारी अर्जाची प्रमाणित प्रत. |
|---|---|

## विवेचन

अंगणवाडी सेविका पदावरुन आपल्याला कमी केल्याच्या संदर्भात श्रीमती शेवंता भाऊ मिसाळ यांनी जन माहिती अधिकारी तथा बालविकास प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बालविकास सेवायोजना प्रकल्प, इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे यांच्याकडे माहिती मागणारे दोन अर्ज केले होते. त्या संदर्भात जन माहिती अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी व अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, इंदापूर यांनी केलेल्या कार्यवाहीने समाधान न झाल्याने श्रीमती मिसाळ यांनी राज्य माहिती आयोगाकडे दोन अपिले केली आहेत.

आपण सुमारे २६ वर्षे सेवा केलेली असताना प्रकल्प अधिकारी, पंचायत समिती, इंदापूर, जि.पुणे यांनी आपल्यावर खोटे आरोप करुन दि.३०.११.२००५ पासून आपल्याला सेवेतून कमी केले. त्या संदर्भातील कागदपत्रे प्रकल्प अधिकाऱ्यांनी आपल्याला दीड वर्षाच्या कालावधीनंतर तत्कालीन अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या आदेशानंतर दिले, असे श्रीमती मिसाळ यांनी लेखी निवेदनात नमूद केले आहे. श्रीमती मिसाळ यांना वेळोवेळी माहिती देण्यात आली असून विलंब झालेला नाही, असे जन माहिती अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बालविकास योजना प्रकल्प, इंदापूर यांनी सांगितले. श्रीमती मिसाळ यांची तशी पोहोचही त्यांनी सादर केली. मात्र महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००२ अन्वये अर्ज होता. तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्यांनी तो निकाली काढला होता. सन १९९६ पासून २००५ पर्यंतच्या शेरे पुस्तकाच्या प्रती श्रीमती मिसाळ यांनी मागितल्या होत्या, त्या देण्यात आल्या आहेत. आधी काही माहिती नाकारली होती. अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या आदेशानंतर ती देण्यात आली, असे प्रतिपादन विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.जे.आर. राव यांनी केले, अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, इंदापूर श्री.डि.ए.वानखेडे यांनी त्याला दुजोरा दिला. आणखी काही माहिती श्रीमती मिसाळ यांना हवी

होती, ती सात दिवसात द्यावी, असे आयोगाच्या पुणे खंडपीठाने दि.१९.३.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त ठरले होते. त्याप्रमाणे तीही माहिती देण्यात आली आहे, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी नमूद केले.

माहितीच्या अधिकाराखाली प्राप्त झालेल्या कागदपत्रांवरुन आपल्यावरील आरोप खोटे असल्याचे निदर्शनास येते, ते लक्षात घेऊन आपल्याला पुन्हा कामावर घ्यावे, ही श्रीमती मिसाळ यांची मुख्य मागणी आहे. सर्व कागदपत्रांमध्ये ती त्यांनी नमूद केली आहे. त्यांच्यावरील आरोपांची चौकशी, आरोप मान्य करणारे व पुन्हा संधी देण्याची मागणी करणारे त्यांचे निवेदन, श्रीमती मिसाळ यांच्याबद्दल तक्रारी नसल्याचे ग्रामस्थांचे पत्र आदि विविध स्वरुपाची कागदपत्रे या अनुषंगाने उभय बाजूंनी सादर केली आहेत. परंतु हा विषय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही. मात्र माहितीच्या अचूकतेच्या व कायद्यानुसार झालेल्या कार्यवाहीच्या पारदर्शकतेच्या दृष्टीने या संदर्भातील कागदपत्रांची तपासणी करुन प्रकरणातील निर्णयाच्या योग्यायोग्यतेची निष्कर्षात्मक माहिती उपलब्ध करुन दिली जाणे गरजेचे आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांनी ही तपासणी करावी.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अमान्य.

(२) अपीलकर्त्या यांच्यावरील आरोपांच्या चौकशीबाबतची कागदपत्रे तपासून त्याविषयीच्या निर्णयाच्या योग्यायोग्यतेबाबतच्या निष्कर्षाची माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांनी आदेश मिळाल्यानंतर एक महिन्यात करुन पूर्तता अहवाल आयोगाला सादर करावा.

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**पुणे**
**दि.११.२.२००९**

प्रत::मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे जिल्हा परिषद, पुणे याना माहितीसाठी व योग्य त्या कारवाईसाठी

५०-५२

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे :

| अ. क्र | अपील क्रमांक | अपील-कर्त्यांचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १७९५ / पुणे | सौ.बिना वसंतराव आनंदे सोपाननगर, सासवड, ता.पुरंदर, जि.पुणे | निवासी नायब तहसीलदार पुरंदर, ता.पुरंदर, जि.पुणे | तहसीलदार पुरंदर, ता.पुरंदर, जि.पुणे | सन २००१ च्या पिसर्वे, भोसले-वाडी, कोथळे या गावाचे रस्त्याचे कामाबाबत मजुरांचे हजेरी पत्रक व तद्-अनुषेगिंक इतर माहिती | माहिती प्राप्त झाल्याबद्दल जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार यांच्याकडे दि.२७.१.२००९ रोजी दिलेल्या जबाबात नमूद केले आहे. |
| २ | १७९६ /पुणे | सौ.बिना वसंतराव आनंदे | निवासी नायब तहसीलदार पुरंदर, ता.पुरंदर, जि.पुणे | तहसीलदार पुरंदर, ता.पुरंदर, जि.पुणे | मौजे पिसर्वे ता.पुरंदर,जि.पुणे येथील गट नं.२३९ फेरफार नं.३४२ प्रमाणे वारसांची नोंद न करता भ्रष्ट मार्गाने नोंद केले बाबत व त्या अनुषंगाने माहिती | |
| ३ | २१५८ / पुणे | श्री. नरेंद्र सिंग चढढा १२ अे, एव्हरग्रीन बिल्डिंग, गुरू गोविंदसिंग मार्ग, खार, मुंबई-५२ | उप विभागीय अधिकारी, मावळ उप विभाग, पुणे | जिल्हाधिकारी पुणे | लॉजिंग बोर्डिंग लायसन्स व त्या अनुषंगाने माहिती | माहिती प्राप्त झाली असल्याने अपील निकाली काढण्याची विनंती अपीलकर्त्याने दि. १७.२.२००९ रोजी केली आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | १०७२/ पुणे | श्री. हरिदास मारूती आखाडे रा.कासुर्डी, ता.दौंड, जि.पुणे | जिल्हा व्यवस्थापक जिल्हा कृषी व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँक, पुणे | जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, पुणे | मौजे कासुर्डी येथील जमीन लिलावा बाबतची सन १९८८ ची कागदपत्रे मिळणे बाबत | माहिती मिळाल्याने तक्रार नसल्याने अपील निकाली काढण्याबाबत अपीलकर्त्याने दि. १६.७.२००८ रोजी पत्रात नमूद केले आहे. |
| ५ | २४३७ + १७६१ / पुणे | श्रीमती सुहासिनी नारायण अवचट ७२७, दत्तवाडी, पूरग्रस्त वसाहत, पुणे-३० | जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, शिवाजी-नगर, पुणे-५ | जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, शिवाजी-नगर, पुणे-५ | सेव्हिंग बँक खाते क्र.४९९६ चा खाते उतारा मिळणेबाबत | आवश्यक माहिती मिळाल्याने अपील निकाली काढण्याबाबत अपीलकर्त्याने दि. १२.७.२००८ रोजीच्या अर्जान्वये आयोगास कळविले आहे. |
| ६ | २८०१/ पुणे | श्री. अशोक जगन्नाथ कदम मु.पो.बावडा, ता.इंदापूर, जि.पुणे | व्यवस्थापक गणेश ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्यादित, अकलूज, जि.सोलापूर | सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, अकलूज, ता.माळशिरस जि.सोलापूर | गणेश नागरी ग्रामीण बिगरशेती सहकारी संस्था यांचेकडे दि.१.१.२००६ ते ३१.१.२००८ या मुदतीत किती सभासदांनी ठेवी ठेवल्या, ठेवी काढल्या, नियमन इ. बाबत माहिती | प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय कायम करण्यात येत आहे. |
| ७ | ७८१/ पुणे | श्री. ज्ञानदेव बापूराव वामन रा.काळवाडी, ता.जुन्नर, जि.पुणे | विस्तार अधिकारी, पंचायत समिती, जुन्नर, जि.पुणे | गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जुन्नर, जि.पुणे | ग्रामपंचायत काळवाडीचे दप्तर तपासणी केलेचा अहवाल | अपीलकर्त्याचे दि. २२.५.२००८ रोजी निधन झाले आहे. तसे अपिलीय प्राधिकारी यांनी दि. २३.६.२००८ रोजीच्या पत्राने कळविले आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

वरील तक्त्यात नमूद केलेली अनु. क्र. १ ते ७ ही सर्व अपिले (क्र. १७९५, १७९६, २१५८, १०७२, २४३७, १७६१, २८०१ व ७८१ ) निकाली काढण्यात येत आहेत.

पुणे
दि. २७.२.२००९

( विजय कुंवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दिनांक २०.०१.२००९ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता :

| अक्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नांव व पत्ता | जन माहिती अधिकारी यांचे नांव | अपिलीय प्राधिकारी यांचे नांव | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १८७१ / पुणे | श्री.सुनिल भगवान थोरात मु.पो.मंचर, ता.आंबेगाव, जि.पुणे | माहिती अधिकारी, ग्रामपंचायत विभाग, पंचायत समिती आंबेगाव, घोडेगाव, जि.पुणे | अपिलीय प्राधिकारी, ग्रामपंचायत विभाग, पंचायत समिती आंबेगाव, घोडेगाव, जि.पुणे | ग्रामसेवक श्री.किसन मोरे यांच्यावर आपल्या मिळकतीच्या फेरफारातील चुकीबाबत काय कारवाई केली, त्याच्या नकला. त्यांना शिक्षा करण्याची मागणी. | चूक दुरुस्त करुन नकलाही दिलेल्या आहेत. अपीलकर्त्याची शिक्षेची मागणी ही माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही. |
| २ | २३०७ / पुणे | श्री.रामदास अनंत जगताप १३७१, कसबा पेठ, पवळे चौक, पुणे-११ | मुख्याध्यापिका, रेंजहिल्स सेकंडरी स्कूल, पुणे - २० | शिक्षणाधिकारी (माध्य.), जिल्हा परिषद पुणे, जि.पुणे | सन १९९० रेंजहिल्स सेकंडरी स्कूल,पुणे-३ येथील शिक्षक पदी नेमणूक करण्यात आलेल्या पदांच्या अनुषंगाने एकूण ४ मुद्यांची माहिती. मूळ प्रश्न अपिलकर्त्याच्या वेतननिश्चितीचा. | अपीलकर्त्यांचा उद्देश साध्य करण्याच्या दिशेने कार्यवाही करण्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ३ | २३४७ / पुणे | श्री.अरुण रामभाऊ येवलेकर पूनम रेसिडेन्सी, फ्लॅट नं.१, प्लॉट | जन माहिती अधिकारी, पुणे विद्यापीठ, गणेशखिंड रोड, पुणे-७ | कुलसचिव, पुणे विद्यापीठ, गणेशखिंड रोड, पुणे-७ | बीसीए सहाव्या सत्रात प्रोजेक्ट सेकंडच्या मार्क निर्धारण बाबत ४ मुद्यांची माहिती | अपीलकर्त्यास आवश्यक ती माहिती देण्यात आलेली असून डेमो, प्रोजेक्ट |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | नं.१३४ सी, कृष्णनगर, चिंचवड, पुणे १९ | | | | रिपोर्ट व व्हायवाचे असे वेगळे गुण विद्यापीठात नाहीत असे अपिलीय प्राधिकाऱ्यांनी त्यांच्या आदेशात नमूद केले आहे. |
| ४ | २३८६/ पुणे | श्री.अंजीर झुंबर जाधव ए-९/००३, नमो रेसिडेन्सी वर्धमान टाऊनशिप, ससाणे नगर, हडपसर, पुणे -२८ | विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, पुणे पी.एम.टी. कमर्शियल बिल्डिंग क्र.१, स्वारगेट, पुणे -९ | विभागीय समाज कल्याण अधिकारी, पुणे , पी.एम.टी. कमर्शियल बिल्डिंग क्र.१ स्वारगेट, पुणे -९ | जात पडताळणीच्या विषयाच्या अनुषंगाने (प्रकरण क्र.१०८०/पुणे) बाबत एकूण ८ मुद्यांबाबतची माहिती | अपीलकर्त्यास सदर माहिती ३० दिवसात देण्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ५ | २४५९/ पुणे | श्री.कारभारी सहादू चौधरी रक्षकनगर फेज-२ बी-३/१०१ खराडी, चंदननगर, पुणे -१४ | माहिती अधिकारी तथा मृद सर्वेक्षण अधिकारी, पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालय, पुणे -१ | अधिक्षक अभियंता व संचालक, पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालय, ८, मोलोदिना पथ, पुणे -११ | दि.१५.०२.२००८ च्या शासन निर्णयात विभागाचा उल्लेख नाही त्याची दुरुस्ती करणेबाबत | अपीलकर्त्याची मागणी ही माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही. |
| ६ | २४६०/ पुणे | श्री.शिवाजी विनायक मोटे रा.दापोडी, ता.दौंड, जि.पुणे | गट विकास अधिकारी (वर्ग-१), पंचायत समिती, दौंड,जि.पुणे | गट विकास अधिकारी (वर्ग-१), पंचायत समिती, दौंड,जि.पुणे | मिळकत नं.२० व ४७४ बाबत ग्रामपंचायत दापोडी,ता.दौंड, जि.पुणे यांनी केलेला ठराव क्र.७९ च्या अनुषंगाने नोंद का करण्यात आली नाही याबाबत माहिती | अपीलकर्त्याची कार्यवाहीची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही. मात्र नोंद न होण्याबाबतच्या कारणांची माहिती ८ दिवसांत दिली पाहिजे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ७ | २४६७ / पुणे | श्री.राजू भिमसेन कोल्हे मु.पो.नारायण-गाव, (कोल्हेमळा), ता.जुन्नर, जि.पुणे | उप-शिक्षणाधिकारी (प्राथ.), जिल्हा परिषद पुणे-१ | शिक्षणाधिकारी (प्राथ.) तथा सचिव सदस्य , निवड समिती, पुणे जिल्हा परिषद, पुणे-१ | सन २००८-०९ या कालावधीत विस्तार अधिकारी (शिक्षण) श्रेणी -२ च्या सरळ सेवा भरतीच्या अनुषंगाने एकूण ९ मुद्दयांची माहिती | अपीलकर्त्यास सदर माहिती ०८ दिवसात देण्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ८ | २४७७ /पुणे | श्री.कांताराम काळे मु.पो.घोडेगाव, ता.आंबेगाव, जि.पुणे | गट विकास अधिकारी, पंचायत समिती, आंबेगाव, ता.आंबेगाव, जि.पुणे | गट विकास अधिकारी (उ.श्रे.) पंचायत समिती, आंबेगाव, ता.आंबेगाव, जि.पुणे | अनधिकृत खाजगी नळ कनेक्शनसंबधातील तक्रारीबाबत | अपीलकर्त्याची मागणी ही माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही. |
| ९ | २४८४ /पुणे | श्री.सुखदेव महादू कर्डिले बिल्डिंग नं.१४, फ्लॅट नं.१३, कमल नयन हौ. सो.इंद्रायणीनगर भोसरी, पुणे -२६ | प्रादेशिक माहिती अधिकारी, एम.आय.डी.सी. जोग सेंटर वाकडेवाडी, पुणे-३ | उप मुख्य कार्यकारी अधिकारी, एम.आय.डी.सी. जोग सेंटर वाकडेवाडी, पुणे-३ | सन १९९७ सालच्या अधिसूचनेनुसार रांजणगाव औद्योगिक वसाहती अंतर्गत प्रकल्पाच्या अनुषंगाने एकूण ४ मुद्यांची माहिती | अपीलकर्त्यास सदर माहिती ०८ दिवसात देण्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. |
| १० | २५८५/ पुणे | श्री.संजय बाबुराव गायकवाड श्री सहजीवन पार्क, एम-३९/ १६२५, महाराष्ट्र हौ.बोर्ड कॉलनी, समतानगर, पुणे-६ | प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा संचालनालय, आरोग्य भवन ५ वा मजला, सेंट जॉर्ज रुग्णालय आवार, मुंबई-१ | मुख्य प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा संचालनालय, आरोग्य भवन, ५ वा मजला, सेंट जॉर्ज रुग्णालय आवार, मुंबई-१ | आरोग्य साधनसामुग्री देखभाल अधिकारी गट - ब या पदाच्या भरतीबाबत, रोस्टरच्या अनुषंगाने एकूण ४ मुद्दयांची माहिती | आवश्यक ती माहिती मिळाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केलेले आहे. |
| ११ | २५७५ /पुणे | सर्वश्री.व्यंकटेश विजय जोशी, | माहिती अधिकारी, पुणे | कुलसचिव, पुणे विद्यापीठ, | सन १९८५ ते १९८८ सेट परीक्षेच्या | अपीलकर्त्यास माहिती १५ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | हिमंशु एम.ठक्कर ४/९३, रामानंद सोसायटी, सुभाष रोड, विलेपार्ले (पू.), मुंबई-५७ | विद्यापीठ, गणेशखिंड रोड, पुणे -७ | गणेशखिंड रोड, पुणे -७ | शैक्षणिक पात्रता युजीसीच्या मार्गदर्शक तत्वानुसार एकूण ४ मुद्यांची माहिती | दिवसात देण्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. |
| १२ | २४९५/ पुणे | श्री.प्रदीप पांडुरंग डवरी ब-२३४/५, शासकीय वसाहत, वांद्रे (पू.), मुंबई-५१ | माहिती अधिकारी, विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती पुणे विभाग, पी.एम.टी. बिल्डिंग, स्वारगेट, पुणे-३७ | अपिलीय प्राधिकारी, विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती पुणे विभाग, पी.एम.टी. बिल्डिंग, स्वारगेट, पुणे-३७ | नाथ पंथीय डवरी गोसावी (भजब) या जातीचा वैधता अहवाल व दि.०५.१२.२००२ च्या सुनावणीचे इतीवृत्त मिळणेबाबत | अपीलकर्त्यास सदर माहिती ०८ दिवसात देण्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. मात्र जातीचा वैधता दाखला देणे ही बाब माहितीचा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही. |

वरील तीनही घटकांमधील चर्चा, त्यांनी सादर केलेली निवेदने व चर्चेअंतीचा निष्कर्ष विचारात घेता उभय बाजूंचे माहितीबाबत व अपील निकाली काढण्याबाबत एकमत झाल्याचे प्रपत्रात नमूद केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. वरील तक्त्यातील अनुक्रमांक १ ते १२ ही अपिले (क्रमांक १८७१, २३०७, २३४७, २३८६, २४५९, २४६०, २४६७, २४७७,२४८४,२४९५,२५७५ व २५८५ ) निकाली काढण्यात येत आहेत.

२. विशिष्ट मुदतीत माहिती देण्याबाबत उभयतांमध्ये एकमत झाले आहे, असे वरील अपिलांमध्ये नमूद केले आहे, तेथे पूर्तता करुन जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी संबंधित मुदतीनंतर एक आठवड्यात

अहवाल आयोगास सादर करावा. त्यानुसार पूर्तता न झाल्यास संबंधित अधिकारी नियमानुसार शास्ती व अन्य कारवाईस पात्र ठरतील.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. १९ -०२-२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे :

| अ. क्र | अपील क्रमांक | अपील-कर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १९२४ / पुणे | ॲड. एस.आर. गोयल अबुशेट रोड, देहू रोड, पुणे-१ | सह दुय्यम निबंधक हवेली, १४, पार्वती हाईट्स, स.नं.६८०/५अ/१ लांडेवाडी चौक, भोसरी, पुणे-३९ | सह जिल्हा निबंधक वर्ग-१ व मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे शहर यांचे कार्यालय, पुष्पा हाईट्स, २ रा मजला, बिबवेवाडी कॉर्नर, पुणे-३७ | श्री. दत्तात्रय दांगट यांच्या मालकीचे मौजे किवळे, स.नं. ३४, हिस्सा नं.२/२/१ येथील जागा श्री. किरण चव्हाण यांचे नावे करावयाची आहे. त्यासाठी खरेदीखताचा ड्राफ्ट व सात बारा जोडला आहे. या खरेदीखतासाठी कायद्याने कोणकोणती कागदपत्रे आवश्यक आहेत, याबाबत माहिती | प्राप्त माहितीने समाधान झाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |
| २ | २४७५/ पुणे | श्री. गुरूबचन सिंग दर्दी रा. ५२५, नाना पेठ, पुणे-५ | पोलीस निरीक्षक, फरासखाना पोलीस स्टेशन, पुणे | पोलीस उपायुक्त, फरासखाना पोलीस स्टेशन, पुणे | सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. गरड यांनी अपीलकर्त्याच्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने केलेले चौकशीची माहिती | अपीलकर्त्याचे दि.६.१०.२००८ रोजी निधन झाल्याबाबत प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ३ | १२४३/ पुणे | श्री. विलास लक्ष्मण जाधव शासकीय दूध योजना, सोलापूर | प्रादेशिक दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी यांचे कार्यालय, कॉमनवेल्थ इमारत, | महाव्यवस्थापक शासकीय दूध योजना, पुणे मरिआई गेट पोलीस चौकीजवळ, | रोजंदारी कर्मचाऱ्यांना नियमित आस्थापनेवर घेण्यात आल्यानंतर त्याचे वेतन निश्चिती आदेश व फरकाचा तपशील मिळणे | अपीलकर्त्याची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | लक्ष्मी पथ, पुणे-३६ | खडकी, पुणे-मुंबई रस्ता, पुणे | | 'माहिती' या सदरात येत नाही. तो प्रशासकीय कार्यवाहीचा विषय आहे. |
| २४५६/ पुणे | श्री. उत्तमचंद भागचंद लुंकड रा. स.नं.३५, प्लॉट क्र.१२, सोमनाथनगर, वडगाव शेरी, पुणे-१४ | सहाय्यक कर आकारणी व कर संकलन प्रमुख, पुणे महानगरपालिका, पुणे | उप आयुक्त तथा कर आकारणी कर संकलन प्रमुख, पुणे महानगर-पालिका, पुणे | मिळकत कराबाबत दि. १८.११.२००४ रोजी दिलेल्या अर्जाप्रमाणे दुरूस्ती करून मिळणे | अपीलकर्त्यास आवश्यक ती माहिती देण्यात आलेली आहे. अपीलकर्त्याची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही. तो प्रशासकीय कार्यवाहीचा विषय आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

वरील तक्त्यात नमूद केलेली सर्व अपिले ( क्र.१९२४, २४७५, १२४३ व २४५९) निकाली काढण्यात येत आहेत.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. १३.२.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला, कौंसिल
हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.गोपाळ निवृत्ती दसवडकर
मु.वरसगाव गोरडवाडी, पो.कुरण, ता.वेल्हे, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, ता.वेल्हे, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत वरसगाव, ता.वेल्हे, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१५ / पुणे / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२१.५.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.गोपाळ निवृत्ती दसवडकर
मु.वरसगाव गोरडवाडी, पो.कुरण, ता.वेल्हे, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, ता.वेल्हे, जि.पुणे प्रतिनिधी श्री.ए.बी.मदने

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत वरसगाव, ता.वेल्हे, जि.पुणे श्री.एस.पी.उदुगडे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १०.५.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २६.७.२००६ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २६.६.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>सन २००१ ते २००६ या कालावधीमध्ये ग्रामस्थांकडून दरवर्षी कर रुपाने पैसे घेतले जात आहेत त्याची माहिती. वीज व्यवस्था गेल्या पाच वर्षांपासून बंद आहे, तरीही वीजकर जमा केला आहे, तो किती आहे व मागणी केल्यावर तो ग्रामस्थांना परत देणार काय? २००६ सालातील रस्त्याच्या कामाबद्दल पंचायतीची परवानगी घेतली होती काय? घेतली असल्यास त्याची प्रत. पंचायत सभासदांची तीन महिन्यांनी मिटिंग होते का व त्या मिटिंगला सर्व सभासद हजर राहतात का याची माहिती. नळकोंडाळे बांधून मिळावे ह्यासाठी ग्रामस्थांच्या सह्यानिशी दोन अर्ज पंचायतीकडे पाठविले आहेत, परंतु पंचायतीने अर्जाची दखल पत्रव्यवहार वा पाहणी केली का, कारणे द्यावीत. ग्रामपंचायतीचा वार्षिक जमा-खर्च व झालेली विकास कामे अशी २००१ ते २००६ पर्यंतची तपशीलवार माहिती. | |

## सुधारित आदेश

**वाचा ::- आयोगाचे समक्रमांकाचे आदेश दि.१०.९.२००८ व दि.१५.१२.२००८**

## विवेचन

उपरोक्त अपिलावर दि.१५.१२.२००८ रोजी पारित केलेल्या सुधारित आदेशनुसार, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत वरसगाव, ता.वेल्हे, जि.पुणे श्री.सी.जी.चव्हाण यांनी चुकीची, वस्तुस्थितीशी विसंगत, दिशाभूल करणारी माहिती दिल्याबद्दल त्यांना रु.२५०००/- शास्ती लावण्यात आलेली आहे. तथापि, श्री.सी.जी.चव्हाण यांचे दि.१४.१२.२००८ रोजी निधन झाले असल्याने शास्ती वसुलीबाबत अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, वेल्हे यांनी त्यांचे दि.१४.१.२००९ रोजीच्या पत्रान्वये आयोगास कळविले आहे. हे लक्षात घेता आयोगाचा सुधारित आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत वरसगाव, ता.वेल्हे, जि.पुणे श्री.सी.जी.चव्हाण यांचे दि.१४.१२.२००८ रोजी निधन झालेले आहे. व्यक्तीच्या मृत्यूनंतर शिक्षा होऊ नये, या सूत्रानुसार या प्रकरणी लावण्यात आलेली शास्ती रु.२५०००/- रद्द करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.९.२.२००९**

जानेवारी-२००९

७७-७९

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. २३.१२.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१७५ / २००८ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. अजित विश्वनाथ सहाणे<br>१०५१-अ, सहाणे सदन, राजेबहादूर लेन,<br>नाशिक शहर - ४२२ ००१ | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | प्र.विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी,<br>पी.एम.टी. बिल्डिंग, स्वारगेट, पुणे | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी,<br>पी.एम.टी. बिल्डिंग, स्वारगेट, पुणे | गैरहजर |

पुणे विद्यापीठातील एम.एस्सी. (बायो इन्फर्मेटीक्स) ह्यासाठीची ओबीसी फ्रीशिप्सची रक्कम आजपावेतो (दि. १३.३.२००८ ) कोणत्या सालापर्यंत आलेली आहे. सन २००६.०७ तसेच २००७-०८ ची फ्रीशिप्सची रक्कम कधी पाठविली आहे. तसेच पाठविली नसल्यास कधी पाठविणार, याबाबतची माहिती अपीलकर्ता श्री. अजित विश्वनाथ सहाणे यांनी दि. १३.३.२००८ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा प्र.विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांच्याकडे मागितली होती.

विशेष जिल्हा समाज कल्याण कार्यालयाकडे उपलब्ध असलेली माहिती अपीलकर्त्यास देण्यात आलेली असून इतर अनुषंगिक माहिती सादर करण्याविषयी पुणे विद्यापीठाकडे दि.१८.३.२००८ च्या पत्रान्वये कळविले. तथापि पूर्तता अहवाल अद्यापही अप्राप्त असल्याचे जन माहिती अधिकाऱ्यांनी आयोगास अवगत केले आहे. तसेच राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे दि.२३.१२.२००८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम'तील प्रपत्रामध्ये नमूद केले आहे. विद्यापीठाच्या जन माहिती अधिकाऱ्यांनी वरील पत्रानुसार माहिती त्वरित देणे आवश्यक होते.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपिल निकाली काढण्यात येत आहे.

२. उप कुलसचिव, पुणे विद्यापीठ (शिक्षण) यांनी विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी कार्यालयांस ८ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करून द्यावी. तसेच विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांचे दि.२८.३.२००८ च्या पत्रानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आयोगास त्वरित सादर करावा.

पुणे
दि. १३ .०२.२००९

( विजय कुंवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

प्रत : उप कुलसचिव, पुणे विद्यापीठ शिक्षण, गणेशखिंड, पुणे यांना कार्यवाहीस्तव अग्रेषित

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. उत्तम आनंदराव पाटील
रा.ऐतवडे खुर्द, ता.वाळवा, जि.सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सांगली

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
सांगली विभाग, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२८/ सांगली / २००८ |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१.७.२००६ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १४.३.२००७ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १३.९.२००६ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १२.२.२००७ |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>नोंदणीकृत ट्रस्टी चेंज रिपोर्ट दाखल झालेनंतर किती दिवसांत मंजूर होतो त्याची माहिती व इतर अनुषंगिक १७ मुद्दयांची माहिती | |

## विवेचन

विश्वस्त संस्थेच्या अनुषंगाने एकूण १७ मुद्दयांची माहिती अपीलकर्ता श्री. उत्तम आनंदराव पाटील यांनी जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सांगली विभाग, सांगली यांच्याकडे मागितली होती. ती न मिळाल्यामुळे श्री. पाटील यांनी अपिलीय प्राधिकारी

तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सांगली विभाग, सांगली यांच्याकडे अपील केले. संबंधित माहिती ही न्यास शाखा, तसेच रेकॉर्ड लिपिक यांच्याशी संबंधित असल्याने संबंधित अर्ज तत्कालीन वरिष्ठ लिपिक श्री. सु.द.घरत यांच्याकडे देण्यात आला. परंतु त्यांच्याकडून माहिती न मिळाल्यामुळे अपीलकर्त्यास माहिती देता आलेली नाही, असे लेखी निवेदन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा प्रभारी अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सांगली श्री. टी.जी.गायकवाड यांनी अपिलीय प्राधिकाऱ्यांपुढे दि. २.२.२००७ रोजी सादर केले. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपील मान्य केले व तीस दिवसात माहिती देण्याचे आदेश जन माहिती अधिकाऱ्यांना दि. १२.२.२००७ रोजी दिले. त्यानंतर दि. १४.३.२००७ रोजी श्री. गायकवाड यांनी अपीलकर्त्यास माहिती दिली. आपल्याला ५१ दिवस विलंबाने माहिती मिळाल्यामुळे शास्तीच्या मागणीसाठी श्री. पाटील यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाने दि. १४.५.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर होते. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. टी. जी. गायकवाड, विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. पी.जी. भोसले, तत्कालीन अपिलीय प्राधिकारी श्री. मि.का.डोंगरे हे त्यावेळी उपस्थित होते. संबंधित लिपिकाकडून माहिती वेळेत न मिळाल्यामुळे विलंब झाला, मात्र संबंधित कालावधीत कर्मचारी वर्ग अपुरा होता, असे या तिघांनीही प्रपत्रात नमूद केले. दि. १२.११.२००८ रोजी आयोगापुढील सुनावणीत श्री. पी.जी.भोसले यांनी त्याचा पुनरूच्चार केला. माहिती देण्यास झालेल्या विलंबाला संबंधित लिपिकच जबाबदार असल्याचेही त्यांनी पुन्हा प्रतिपादन केले. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. टी.जी. गायकवाड यांनी संबंधित लिपिकाच्या नावासह त्यांचे म्हणणे एक आठवड्यात सादर करावे, असा आदेश आयोगाने दिला. श्री. भोसले यांनी दि. १४.११.२००८ च्या पत्रान्वये श्री. गायकवाड (सध्या सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सातारा ) यांना दि. २५.११.२००८ ( प्राप्त दि. २.१२.२००८ ) रोजी सादर केलेल्या लेखी निवेदनातही विलंबास तत्कालीन वरिष्ठ लिपिक श्री. सु.द. घरत ( सध्या सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, रायगड -अलिबाग ) हे जबाबदार असल्याचे नमूद केले.

दि. १४.३.२००७ च्या पत्रान्वये श्री. गायकवाड यांनी दिलेली माहिती पाहता सर्व तपशील न्याय शाखेच्या वरिष्ठ लिपिकाशी संबंधित नाही, हे स्पष्ट होते. उदा. 'आपण मुंबई सार्वजनिक विश्वस्त

व्यवस्था अधिनियम १९५० चे कायद्याच्या पुस्तकाचा अभ्यास करावा,' असे उत्तर मुद्दा क्र. १ ते १०, अंशतः मुद्दा क्र.११, मुद्दा क्र. १२ ते १४, मुद्दा क्र. १६ याबाबत दिले आहे. हे उत्तर मूळ मुद्दयांची माहिती देणारे नाही, तसेच माहिती मागणारा अर्ज आल्यापासून तीस दिवसांच्या विहित मुदतीत हे उत्तर देता आले असते. त्यामुळे श्री. घरत यांच्या बरोबरच श्री. गायकवाड हेही विलंबास जबाबदार ठरतात. मूळ अर्ज दि. २१.६.२००६ रोजीचा असून माहिती दि. १४.३.२००८ रोजी दिली आहे. मात्र माहिती देण्यास ५१ दिवस विलंब झाल्याचे अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी या तिघांचेही याबाबत एकमत आहे. त्यामुळे हा कालावधी शास्तीसाठी गृहीत धरण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. श्री. श्री. टी. जी. गायकवाड, अधीक्षक तथा तत्कालीन जन माहिती अधिकारी, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सांगली (सध्या सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सातारा विभाग, सातारा ) व श्री. सु.द.घरत, तत्कालीन वरिष्ठ लिपिक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सांगली (सध्या रायगड -अलिबाग ) या दोघांना प्रत्येकी रू. ६३७५/- (एकूण रू. २५० x ५१ दिवस) एवढी शास्ती लावण्यात येत आहे. सदरची शास्ती फेब्रुवारी २००९ या महिन्याच्या व मार्च २००९ या महिन्यात देय असलेल्या वेतनातून वसूल करून '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, १८ माहितीचा अधिकार ००७००१६१' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सातारा विभाग, सातारा व अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, रायगड-अलिबाग यांनी करावी. तसेच त्याबाबतची नोंद त्यांचे सेवापुस्तक व गोपनीय अहवालात घेऊन तसा पूर्तता अहवाल आयोगाला सादर करावा.

पुणे
दि. १९.२.२००९

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे :

| अ. क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २२८४/ पुणे | श्री. गुरूबचन सिंग दर्दी रा.५२५, नाना पेठ, पुणे-२ | सह दुय्यम निबंधक, हवेली क्र.२, पुणे | सह जिल्हा निबंधक वर्ग-१, पुणे शहर, पुष्पा हाईटस्, बिबवेवाडी कॉर्नर, पुणे | दस्त क्र.८८५८ /१९८८ ची प्रत मिळणेबाबत | अपीलकर्त्याचे दि.६.१०.२००८ रोजी निधन झाले आहे. |
| २ | २४२८/ पुणे | श्री. देवानंद भाऊराव सानप रा. सर्कल नं.१, बराक नं.२, येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे-६ | पोलीस उप अधीक्षक (मु) सोलापूर ग्रामीण | पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण | दि.१३.३.२००८ ते १२.४.२००८ या अभिवचन - रजेचा पोलीस अहवाल | जन माहिती अधिकारी यांनी त्यांचेकडील जावक पत्र क्र.६८०४/०८ दि. १४.११.२००८ अन्वये माहिती पोस्टाने पाठविली आहे. |
| ३ | १९७०/ पुणे | श्री. ज्ञानेश्वर सिताराम कराळे ज्ञानेश्वरी, सर्व्हे नं.७/२, गाथा मंदिर रोड, देहुगांव, ता.हवेली, जि. पुणे | सह जिल्हा निबंधक वर्ग-२, नोंदणी उप महानिरीक्षक व मुद्रांक उप नियंत्रक, पुणे | नोंदणी उप महानिरीक्षक व मुद्रांक उप नियंत्रक, पुणे-१ | श्रीमती एन.आर. पाटील यांच्या संपूर्ण कारकिर्दी विषयीची, तसेच त्यांच्या काळात झालेल्या सर्व प्रकारच्या बदल्यां बाबतची माहिती | माहिती मिळाल्याचे मान्य करून अपील निकाली काढणेची विनंती अपीलकर्त्याने दि. १५.२.२००८ रोजीचे अर्जान्वये केली आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | १२२१/ पुणे | श्री. शरद रामण्णा शेट्टी रा.फ्लॅट नं.१४, वीरभद्रनगर, प्रेमप्रभा, बाणेर रोड, पुणे-५ | जन माहिती अधिकारी, राज्य कामगार विमा योजना रूग्णालय, औंध कॅम्प, पुणे | संचालक, राज्य कामगार विमा योजना रुग्णालय, औंध कॅम्प, पुणे | सन २००५-२००६ या कालावधीतील राज्य कामगार विमा योजना, औंध येथील रूग्णालय स्थलातंराबाबत | जन माहिती अधिकारी यांनी दि.१८.१०.२००७ रोजीच्या पत्रान्वये शुल्क भरण्याबाबत कळविले आहे. अपीलकर्त्याने माहिती आवश्यक असल्यास शुल्क भरून प्राप्त करून घ्यावी. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

वरील तक्त्यात नमूद केलेली सर्व अपिले अनु क्र. १ ते ४ (क्र. २२८४, २४२८, १९७० व १२२१ / पुणे ) निकाली काढण्यात येत आहेत.

**पुणे**
**दि. २१.२.२००९**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. नामदेव बाळासाहेब खरात — अपीलकर्ता
नितीराज निवास, निरा, ता.पुरंदर, जि.पुणे

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, सातारा

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बाक)
जिल्हा परिषद, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३२९ / पुणे |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २४.६.२००८ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १४.७.२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २१.७.२००८ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३०.८.२००८ |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>मौजे खरातवाडी येथील ग्रामस्थांनी दि.६.६.२००८ रोजी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने माहिती | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. नामदेव बाबासाहेब खरात यांनी दि.६.६.२००८ मौजे खरातवाडी येथील ग्रामस्थांनी दिलेल्या तक्रारींच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या कारवाईचा तपशील मागितला होता.

अपीलकर्ता श्री. खरात यांच्या माहिती अर्जातील माहितीसाठी एकूण रू. १४५/- भरण्याबाबत जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बांक), जिल्हा परिषद, सातारा यांनी दि.१४.७.२००८ रोजीच्या पत्रान्वये कळविले होते. सदर माहितीच्या अनुषंगाने श्री. खरात यांनी दि. २१.७.२००८ रोजी अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सातारा यांच्याकडे अपील दाखल केले. या अपिलाची सुनावणी दि. २८.९.२००८ रोजी घेण्यात आली. यामध्ये यापूर्वी जन माहिती अधिकारी यांनी कळविल्याप्रमाणे शुल्क भरल्यानंतर माहिती द्यावी, असा निर्णय दि. ३०.८.२००८ रोजी घेण्यात आला होता. सदर निर्णय कायम करण्यात येत आहे. शुल्क न भरता अपील करणे योग्य नसून सर्व यंत्रणांच्या वेळेचा व कार्यशक्तीचा अपव्यय करणे आहे. तसे न करण्याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २६.२.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. २९.१.२००९ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३७४ / २००८ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. दिपक शंकर पवार<br>रा.देवकरवाडी, ता. दौंड, जि. पुणे | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | कार्यालय अधीक्षक, पुणे ग्रामीण विभाग, पुणे | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण, पुणे | हजर |

अपीलकर्ता श्री. दिपक शंकर पवार यांनी कार्यालय अधीक्षक, पुणे ग्रामीण, पुणे यांच्याकडे दि.१२.७.२००८ रोजीच्या अर्जान्वये दि.९.६.२००८ रोजीच्या माहिती अर्जानुसार मुलगी कु. किर्ती ऊर्फ संध्या हिचे वय १८ वर्ष पुर्ण झाले आहे, याबाबतचे सत्यता काय आधारे सिध्द केली याबाबतची माहिती मागितली होती.

अपील अर्जाच्या अनुषंगाने प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण, पुणे यांच्याकडील दि.१७.१२.२००८ रोजीचा दाखल अहवाल पाहता अर्जदारास त्यांचे मागणी प्रमाणे संपूर्ण माहिती देण्यात आली आहे. तशी माहिती मिळाल्याबाबत स्थळप्रतीवर अपीलकर्त्याने स्वाक्षरी केलेली आहे.

दि.२९.१.२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त अपीलकर्त्याने असे नमूद केले आहे की, मुलगी किर्ती ऊर्फ संध्या हिचे दि.२७.३.२००६ रोजी अपहरण झालेल्या घटनेची चौकशी होऊन संबंधित सर्व गुन्हेगारांवर कडक कारवाई व्हावी. तसेच सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. राजेंद्र मोहिते, व सरमाने, व इतर कर्मचाऱ्यांची चौकशी होऊन खोट्या सह्या करून खोटे जबाब तयार

करणारावर कडक कारवाई व्हावी. सदरची बाब माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये येत नसून प्रशासकीय कार्यवाहीचा भाग आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. १३.०२.२००९**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**